महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ

कल्पतरु पाईट इमारत, २ रा मजला,
सिने प्लॅनेट सिनेमासमोर, सायन-माटुंगा
स्किम रोड नं.८, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२

जावक क्र.मप्रनि/विधी व योजना विभाग/61-3070 दिनांक : 31/04/२०११

प्रति,
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर.

विषय : वाळू/रेती उत्खननासाठी सक्शन पंप लावण्यासाठी पर्यावरण ना हरकत दाखला मिळणेबाबत

संदर्भ : आपली दिनांक ३/३/२०११ ची कार्यालयीन टिप्पणी

--------

उपरोक्त विषयावरील प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, कोल्हापूर यांच्या दिनांक ३/३/२०११ च्या कार्यालयीन टिप्पणीस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वने मंत्रालयाने त्यांच्या दिनांक १४/९/२००६ च्या अधिसूचनेनुसार, त्यापूर्वीचे पर्यावरण अनुमतीबाबतचे आदेश/अधिसूचना अधिक्रमित करुन सुधारीत पर्यावरण मुल्यांकन अधिसूचना, २००६ पारीत केलेली आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या अधिसूचनेवर आधारीत असलेल्या राज्य शासनाचा विषयाधीन शासन निर्णय रद्द करण्याची कार्यवाही, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून करण्यात येत असल्याने, सद्यस्थितीत दिनांक १४/९/२००६ च्या अधिसूचनेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या दिनांक ७/८/१९९७ चा शासन निर्णय व त्यातील सुधारणा विचारात घेऊ नये. तसेच, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचा दिनांक ७/८/१९९८७ चा शासन निर्णय व दिनांक ३/६/२००० व ३/१/२००३ चे सुधारीत शासन निर्णय तसेच महसूल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक २५/१०/२०१० च्या वाळू/रेती उत्खनन धोरणानुसार ५ हेक्टरपर्यंतच्या क्षेत्रातील रेती / वाळू उत्खनन करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही, असे स्पष्ट होते. तरी यापुढे ५ हेक्टरपेक्षा कमी असणा-या वाळू व रेती उत्खननासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ कोणतेही संमतीपत्र देऊ शकणार नाही. परंतु नवीन वाळू व रेती उत्खनन धोरण, २०१० नुसार ५ हेक्टरपेक्षा जास्त व ५० हेक्टरपर्यंत वाळू उत्खननाकरिता राज्य पर्यावरण तज्ञ मुल्यांकन समितीने योग्य ते पर्यावरण मुल्यांकन करुन, राज्य पर्यावरण तज्ञ मुल्यांकन समितीने योग्य ती पर्यावरण अनुमती देणे गरजेचे आहे. तसेच, ५० हेक्टरपेक्षा जास्त वाळू व रेती उत्खननासाठी केंद्रीय पर्यावरण तज्ञ समितीने पर्यावरणदृष्ट्या योग्य ते पर्यावरण मुल्यांकन करुन शिफारस केल्यानंतर केंद्रीय पर्यावरण मुल्यांकन समितीने दिलेल्या पर्यावरण अनुमतीनंतरच असे उत्खनन करता येईल, असे स्पष्ट करण्यात आलेले आहे. त्यासाठी योग्य तो पर्यावरण आघात मुल्यांकन अभ्यास करणे आवश्यक करण्यात आलेले आहे. त्यामुळे ० ते ५ हेक्टरपेक्षा जास्त वाळू

उत्खननासाठी योग्य ती पर्यावरण अनुमती व संमतीपत्र घेणे आवश्यक होईल.

येणेप्रमाणे वरीलप्रमाणे योग्य त्या मार्गदर्शक सूचना योग्य त्या पूर्ततेकरिता प्रसारीत करण्यात येत आहेत. तरी सोबत आपल्या कार्यालयीन टिप्पणीसोबत असलेल्या प्रस्तावित यशस्वी लिलावधारकांची यादी व पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक २५/४/२०११ च्या पत्राची छायांकित प्रत आपल्या माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात येत आहे.

21/5/2011

( राधेश्याम मोपलवार )
सदस्य सचिव

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी : सह संचालक (हवा प्रदूषण नियंत्रण)/वरिष्ठ विधी अधिकारी/सह संचालक (तांत्रिक) व प्रादेशिक अधिकारी(प्रकल्प व योजना, मप्रनि मंडळ, मुंबई

सहायक सिस्टम अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई :- सदर पत्र मंडळाच्या वेबसाईटवर दाखवण्यात यावे.

C:\Documents and Settings\admin\My Documents\Marathi\Mantralaya.doc.doc

महाराष्ट्र शासन

✆ २२८१.
📠 २२०२ ५९ ४६

क्रमांक: SEAC २०११/प्र.क्र. ४६/तां.क्र. २
पर्यावरण विभाग,
मंत्रालय, १५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन,
मदाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २५ एप्रिल, २०११

M. P. C. BOARD Board Section ... 11-4-2766 ... Sion, Mumbai-22

प्रति,

सदस्य सचिव,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुंबई.

विषय : शासन निर्णय दिनांक ७ ऑगस्ट, १९९७ च्या अनुषंगाने पर्यावरण अनुमतीबाबत

राज्य पर्यावरण विभागास विविध उद्योगामार्फत केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या दिनांक १५ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेत दर्शविण्यात आलेल्या क्षमतेपेक्षा, कमी क्षमतेच्या प्रकल्पांच्या संदर्भात पर्यावरण अनुमती देण्याबाबतचे प्रस्ताव प्राप्त होत आहेत.

२. केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने त्यांच्या दिनांक १५ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार त्यापूर्वीचे पर्यावरण अनुमतीबाबतचे आदेश/अधिसूचना अधिक्रमित करुन सुधारित पर्यावरण-मुल्यांकन अधिसूचना, २००६ पारित केलेली आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या १९९४ च्या अधिसूचनेवर आधारित असलेला राज्य शासनाचा विषयाधीन शासन निर्णय रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सद्यस्थितीत केंद्र शासनाच्या दिनांक १५/०९/२००६ च्या अधिसूचनेनुसार कार्यवाही करण्यात येत असल्याने, राज्य शासनाचा दि. ११९७ चा शासन निर्णय व त्यातील सुधारणा विचारात घेण्यात येवू नयेत.

(ज्ञा. ज. भारती)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

X

## ५ हेक्टरपर्यंतच्या क्षेत्रातील रेती / वाळू उत्खननासाठी पर्यावरण परवानगीसाठी यशस्वी लिलाव धारकांची यादी

| अ.क्र. | गावाचे नाव | गट नं | लिलावधारकांचे नाव व पत्ता | जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे पत्र क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | उदगांव, तालुका: शिरोळ | ३६२ ते ३६४ | सागर सुकुमार मादनाईक, रा.जयसिंगपूर, ता.शिरोळ, जिल्हा: शिरोळ | कार्या/६अ/आरआर/वालि/१३८/२०११, दिनांक ३/३/२०११ |
| २. | कवठेगुलंद ता.शिरोळ | २ ते १३ | आयुबखान नवी वाळवेकर, रा.कवठेगुलंद, ता.शिरोळ | कार्या/६अ/आरआर/वालि/१३९/२०११, दिनांक ३/३/२०११ |
| ३. | कुटवाड, ता.शिरोळ | १०,११, १२ | प्रकाश रामचंद्र पाटील, रा.कुटवाड, ता.शिरोळ, जिल्हा : कोल्हापूर | कार्या/६अ/आरआर/वालि/१५२/२०११, दिनांक ७/३/२०११ |
| ४. | कवठेगुलंद ता.शिरोळ | ५६७ अ, ब | आयुबखान नवी वाळवेकर, रा.कवठेगुलंद, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | कार्या/६अ/आरआर/वालि/१५१/२०११, दिनांक ७/३/२०११ |
| ५. | इंचनाळ तां.गडहिंग्लज | ६६४ | आण्णासो बाबू कोरे, रा.रेंदाळ, ता.हातकणंगले, जिल्हा : कोल्हापूर | कार्या/६अ/आरआर/वालि/१६३/२०११, दिनांक ११/३/२०११ |
| ६ | इंचनाळ तां.गडहिंग्लज | ६७० | आण्णासो बाबू कोरे, रा.रेंदाळ, ता.हातकणंगले, जिल्हा : कोल्हापूर | कार्या/६अ/आरआर/वालि/१६४/२०११, दिनांक ११/३/२०११ |
| ७. | कवठेगुलंद ता.शिरोळ | १७ ते २० | प्रविण शंकर कांबळे, रा.शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | कार्या/६अ/आरआर/वालि/१५३/२०११, दिनांक ७/३/२०११ |
| ८ | भादोले तालुका हातकणंगले | १०७१, १०७६ ते १०७८, १०९८ ते ११०३, ११३२ ते ११३५ | बाळासाहेब सर्जेराव माने, रा.भादोले, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर | कार्या/६अ/आरआर/वालि/१६७/२०११, दिनांक ११/३/२०११ |
| ९. | शेडशाळ, ता.शिरोळ | ८६, ८७ | पांडूरंग श्रीपती पोवार, रा.शेडशाळ, | कार्या/६अ/आरआर/वालि/१३२/२०११, दिनांक |

K

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ता.शिरोळ, जि. कोल्हापूर | १/३/२०११ |
| १० | शेडशाळ, ता.शिरोळ | ११ व १२ | म्हाबुबपाशा दादेबापु पाटील, रा.शेडशाळ, ता.शिरोळ, जिल्हा : कोल्हापूर | कार्या/६अ/आरआर/वालि/१३१/२०११, दिनांक १/३/२०११ |
| ११ | कनवाड, ता.शिरोळ | १९४, १९६ | जावेद हमीद पुणेकर, रा.इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली. | कार्या/६अ/आरआर/वालि/१३२/२०११, दिनांक १/३/२०११ |
| १२ | पारगांव पैकी निलेवाडी, ता.हातकणंगले | १६८२/२१, १६८२/२२, १६८२/२३ | निलेश रंगराव थोरात, रा.कारवे, ता.कराड, जि.सातारा | कार्या/६अ/आरआर/वालि/९८/२०११, दिनांक १७/२/२०११ |
| १३ | कनवाड, ता.शिरोळ | २८३, ३०५ | बसवेश्वर महालिंगय्या स्वामी, रा.विजयनगर, वानलेसवाडी, जिल्हा : सांगली | कार्या/६अ/आरआर/वालि/१२०/२०११, दिनांक २५/२/२०११ |
| १४ | कनवाड, ता.शिरोळ, | ९८ | कृष्णात हिंमतराव हेंगाणा, रा.अर्जुनवाड, ता.शिरोळ | कार्या/६अ/आरआर/वालि/१२१/२०११, दिनांक २५/२/२०११ |
| १५ | बुबनाळ, ता.शिरोळ | ५०१ | तानाजी लक्ष्मण पाटील, रा.दत्तमंदीर, शिरोळ, ता.शिरोळ, जिल्हा कोल्हापूर | कार्या/६अ/आरआर/वालि/१२२/२०११, दिनांक २५/२/२०११ |
| १६. | आलास, ता.शिरोळ | ३० | इम्रान नबीसो पाटील रा.औरवाड, ता.शिरोळ | कार्या/६अ/आरआर/वालि/१२३/२०११, दिनांक २५/२/२०११ |
| १७ | औरवाड, ता.शिरोळ | २१२, २१३ | बुखीर अल्लाउद्दीन पटेल, रा.औरवाड, ता.शिरोळ, जिल्हा कोल्हापूर | कार्या/६अ/आरआर/वालि/१२४/२०११, दिनांक २५/२/२०११ |
| १८ | कनवाड, ता.शिरोळ | ५३ | संदीप तातोबा साळुंखे, रा.करवीर, ता.करवीर, जिल्हा कोल्हापूर | कार्या/६अ/आरआर/वालि/१२५/२०११, दिनांक २५/२/२०११ |
| १९ | कुटवाड ता.शिरोळ | ५८७ ब, ५८८, ५८९ | किशोर आनंदराव पाटील, रा.पदमाळे, ता.मिरज, जिल्हा सांगली | कार्या/६अ/आरआर/वालि/१२६/२०११, दिनांक २५/२/२०११ |
| २० | बुबनाळ, ता.शिरोळ | ५३ | हर्षवर्धन धरणेंद्र मरजे, रा.बुबनाळ, ता.शिरोळ, जिल्हा : कोल्हापूर | कार्या/६अ/आरआर/वालि/१२७/२०११, दिनांक २५/२/२०११ |
| २१ | भडगांव , | १७२८ ते | अशोक भैराण्णा | कार्या/६अ/आरआर/वालि/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ता.गडहिंग्लज | १७३०, १७३३ | मगदूम, रा.गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | १७६/२०११, दिनांक १६/३/२०११ |
| २२ | कनवाड, ता.शिरोळ | २३४, २३५ अ, २३६ | शहेनशहा मिरासाहेब मुजावर, रा.जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | कार्या/६अ/आरआर/वालि/१७७/२०११, दिनांक १६/३/२०११ |
| २३ | आलास, ता.शिरोळ | १०६५ | सरफराज इब्राहीम मुल्ला, रा.कोल्हापूर, ता.करवीर, जि.कोल्हापूर | कार्या/६अ/आरआर/वालि/१३८/२०११, दिनांक ३/३/२०११ |

५

## ५ हेक्टरपर्यंतच्या क्षेत्रातील रेती / वाळू उत्खननासाठी पर्यावरण परवानगीसाठी यशस्वी लिलाव धारकांची यादी

| अ.क्र. | गावाचे नाव | गट नं | लिलावधारकांचे नाव व पत्ता | जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे पत्र क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | औरवाड, ता.शिरोळ | १२५ | अफसर मौलाअली पटे, रा.औरवाड, ता.शिरोळ | कार्या/६अ/आरआर/वालि/४२/२०११, दिनांक २५/१/२०११ |
| २. | राजापूर,ता.शिरोळ | १४४ | अमिरहमजा गौसमोहीदीन पटेल, रा.औरवाड, ता.शिरोळ | |
| ३. | बस्तवाड, ता.शिरोळ | ४१६ | प्यारेसाहेब हजरत पाटील, रा.बस्तवाड ता.शिरोळ | |
| ४. | हिरलगे, ता.गडहिंग्लज | २९८/१ ते ३, २९९, ३००, ३०३, अ, ब, ३०४, ३०७ | स्फूर्ती मित्र मंडळ तर्फे चंद्रशेखर रामचंद्र पाटील, रा.वाळवा, ता.वाळवा, जिल्हा : सांगली | |
| ५ | भेंडवडे, ता.हातकणंगले | ७५, ७६, ९३/१, ९३/२ | अभिजित सर्जेराव माने, रा.भेंडवडे, ता.हातकणंगले | |
| ६. | घुणकी ता.हातकणंगले | १५४८ ते १५५१, १६७० ते १६७२, १६७४, १६७६, १६७९, १६९७ ते १६९९ | सदाशिव बाबू गडदे, रा.पेठवडगांव, ता.हातकणंगले | |
| ७. | घुणकी , तालुका हातकणंगले | १२७९ अ, १२७९ ब १ ते १२७९ ब ११ | प्रमोद आण्णासो आवटी, रा.दुधगांव, ता.मिरज, जि.सांगली | |
| ८. | पारगाव पैकी निलेवाडी, ता.हातकणंगले | १८७५ ते १८८० | स्फूर्ती मित्र मंडळ तर्फे चंद्रशेखर रामचंद्र पाटील | |
| ९. | आकीवाट, ता.शिरोळ | २१५ | संतोष आप्पासो जानवेकर, रा.इचलकरंजी, ता.हातकणंगले | |
| १०. | आकीवाट, ता.शिरोळ | १४३३ | चंद्रकांत गणपती जगदाळे, रा.काडिग्रज, ता.मिरज | |
| ११. | कोथळी, ता.शिरोळ | २०२ ते २०४ | गजानन सदाशिव जगदाळे, रा.हरिपूर, ता.मिरज | |
| १२. | घुणकी, ता.हातकणंगले | १४२४ फ, १४४१ ते १४५२, १५४७, १५८६ | सचिन महिपती गावडे, रा.येळावी, ता.पलूस | |
| १३ | पारगांव पैकी निलेवाडी ता.हातकणंगले | १६८२/२१, १६८२/२२, | निलेश रंगराव थोरात, रा.कारवे, ता.कराड | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | १६८२/२३ | | |
| १४ | भादोले ता.हातकणंगले | १४३८,१४४२ ते १४४६, १४४९, १४५३ | नारायण विलास साळुंखे, रा.ताकारी, ता.वाळवा | |

# ५ हेक्टरपर्यंतच्या क्षेत्रातील रेती / वाळू उत्खननासाठी पर्यावरण परवानगीसाठी यशस्वी लिलाव धारकांची यादी

| अ.नं. | तालुका | गावाचे नाव | नदीचे नाव | नदीपात्रालगतचे गट नंबर | भूखंडातील अंदाजे वाळू ब्रास | जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे पत्र क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | शिरोळ | आलास | कृष्णा | ३० | १८९० | कार्या/६अ/आरआर/१६२/२०११, दिनांक १०/३/२०११ |
| २. | शिरोळ | आलास | कृष्णा | १०६५ | १८६० | |
| ३. | शिरोळ | आलास | कृष्णा | १०७० | ३१८५ | |
| ४. | शिरोळ | औरवाड | कृष्णा | १६०, १६१ | ३६०० | |
| ५ | शिरोळ | औरवाड | कृष्णा | २०५, २०८ | ३१५० | |
| ६. | शिरोळ | औरवाड | कृष्णा | १७७ ते १८०, १८२, १८३ | ४५९३ | |
| ७. | शिरोळ | औरवाड | कृष्णा | १८५, १८६ | ४३७५ | |
| ८. | शिरोळ | औरवाड | कृष्णा | २१२, २१३ | २७०० | |
| ९. | सदर अनुक्रमांकाचा तपशील छायांकित केला गेला नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या पत्र क्र. कार्या/६अ/आरआर/१६२/२०११, दिनांक १०/३/२०११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे | | | | | |
| १०. | | | | | | |
| ११. | | | | | | |
| १२. | | | | | | |
| १३. | शिरोळ | कनवाड | कृष्णा | १९४, १९६ | १७५० | कार्या/६अ/आरआर/१६२/२०११, दिनांक १०/३/२०११ |
| १४. | शिरोळ | कनवाड | कृष्णा | १०७ उत्तर बाजू | २४७५ | |
| १५. | शिरोळ | कनवाड | कृष्णा | १०२ | २००० | |
| १६ | शिरोळ | कनवाड | कृष्णा | ४६ | १७०० | |
| १७ | शिरोळ | कनवाड | कृष्णा | २३४, २३५अ, २३६ | १६५० | |
| १८ | शिरोळ | बस्तवाड | कृष्णा | ४०६ | २१५० | |
| १९ | शिरोळ | बस्तवाड | कृष्णा | ३५८ | २१२५ | |
| २० | शिरोळ | कवठेगुलंद | कृष्णा | ५४८, ५५२/६ | १९८० | |
| २१ | शिरोळ | कवठेगुलंद | कृष्णा | ५६०, ५६१/१०, ५६२ | ३५६४ | |
| २२ | शिरोळ | कवठेगुलंद | कृष्णा | ५८२ | २९७० | |
| २३ | शिरोळ | कवठेगुलंद | कृष्णा | ५५३ | ३६९६ | |
| २४ | शिरोळ | कवठेगुलंद | कृष्णा | ५७२ | १६२५ | |
| २५ | शिरोळ | कवठेगुलंद | कृष्णा | २ ते १३ | २०४६ | |
| २६ | शिरोळ | कवठेगुलंद | कृष्णा | १७ ते २० | २०१३ | |
| २७ | शिरोळ | कवठेगुलंद | कृष्णा | ५६७ अ, ब | १६५० | |
| २८ | शिरोळ | शेडशाळ | कृष्णा | ८६,८७ | १७०० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २९ | शिरोळ | शेडशाळ | कृष्णा | ११ व १२ | १६०० | |
| ३० | शिरोळ | शेडशाळ | कृष्णा | ७३/२ | १६०० | |
| ३१ | शिरोळ | कुटवाड | कृष्णा | ५८७, ब ५८८, ५८९ | १६५० | |
| ३२ | शिरोळ | कुटवाड | कृष्णा | १०,११, १२ | १५०० | |
| ३३ | शिरोळ | आकीवाट | कृष्णा | २११ | २४०० | |
| ३४ | शिरोळ | आकीवाट | कृष्णा | २१२ | २३५० | |
| ३५ | शिरोळ | कोथळी | कृष्णा | ३५० | २६९५ | |
| ३६ | शिरोळ | कोथळी | कृष्णा | ४७७ | २७५० | |
| ३७ | शिरोळ | बुबनाळ | कृष्णा | ५३ | १८६० | |
| ३८ | शिरोळ | बुबनाळ | कृष्णा | ५०१ | १६२० | |
| ३९ | शिरोळ | चिंचवड | कृष्णा | ३३ | १५०० | |
| ४० | शिरोळ | उदगांव | कृष्णा | ३६२ ते ३६४ | १८८० | |
| ४१ | हातकणंगले | घुणकी | वारणा | १४२४ क, १४२४ड | १०८० | |
| ४२ | हातकणंगले | घुणकी | वारणा | १४२४ अ, १४२४ब | ११०० | |
| ४३ | हातकणंगले | खोची | वारणा | ११४१ ते ११५३ | ३७५० | |
| ४४ | हातकणंगले | घुणकी | वारणा | ११४९ ते ११४८ | १२५० | |
| ४५ | गडहिंग्लज | महागाव | हिरण्यकेशी | ४७ ते ५७ | २२५ | |
| ४६ | गडहिंग्लज | महागाव | हिरण्यकेशी | १६२३ ते १६२६, ३७, ३९, ४३ ते ४५ | २०० | |
| ४७ | गडहिंग्लज | भडगाव | हिरण्यकेशी | ३९,४१ | २०० | |
| ४८ | गडहिंग्लज | भडगाव | हिरण्यकेशी | १७२८ ते १७३०, १७३३ | १५० | |
| ४९ | गडहिंग्लज | भडगाव | हिरण्यकेशी | ४१ | ६० | |
| ५० | गडहिंग्लज | भडगाव | हिरण्यकेशी | ११० | ६० | |
| ५१ | गडहिंग्लज | भडगाव | हिरण्यकेशी | १५८७ | ७० | |
| ५२ | गडहिंग्लज | इंचनाळ | हिरण्यकेशी | ६७० | १६० | |
| ५३ | गडहिंग्लज | इंचनाळ | हिरण्यकेशी | ६६४ | १९० | |
| ५४ | आजरा | गजरगाव | हिरण्यकेशी | ७० ते ७२, ७४ | १६० | |
| ५५ | आजरा | गजरगाव | हिरण्यकेशी | २३५ ते २४३ | १६० | |
| ५६ | सदर अनुक्रमांकांचा तपशील छायांकित केला गेला नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी, कोल्हापूर | | | | | |
| ५७ | यांच्या पत्र क्र. कार्या/६अ/आरआर/१६२/२०११, दिनांक १०/३/२०११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे | | | | | |
| ५८ | शिरोळ | बस्तवाड | कृष्णा | २२ | १६५० | कार्या/६अ/आरआर/१६२/२०११, दिनांक १०/३/२०११ |
| ५९ | हातकणंगले | भादोले | वारणा | ८३३ ते ८४३ | ४५० | |
| ६० | हातकणंगले | भादोले | वारणा | ३३२, ८२७, ८२९, ८३० | ४०० | |
| ६१ | हातकणंगले | पारगांव | वारणा | १८६० | २१६ | |

K

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पैकी निलेवाडी | | | | |
| ६२ | पन्हाळा | कोडोली | वारणा | २७३ | ५०० | |
| ६३ | पन्हाळा | कोडोली | वारणा | २७३ पश्चिम बाजू | ३५० | |

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

जावक क्र : मप्रनि/विधी व योजना विभाग/म- १२३

दिनांक : २० /०५ /२०११

प्रति,

विभागीय आयुक्त,
औरंगबाद/पुणे/नाशिक/अमरावती/कोकण विभाग/नागपूर

विषय : उद्योगधंद्यांना पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन या विभागाकडून द्यावयाच्या पर्यावरण अनुमतीबाबतचा शासन निर्णय दिनांक ७/८/१९९७ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेली सुधारणा हे केंद्र शासनाच्या दिनांक १४/९/२००६ च्या अधिसुचनेमुळे निष्प्रभावित म्हणून जाहीर करणेबाबत/अधिक्रमित होणेबाबत

---------

पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत वेगवेगळया प्रदुषित उद्योगांना पर्यावरण अनुमती मंजूर करणेबाबत शासन निर्णय क्र.इएनव्ही १०९४/एस.इ.ए.सी./सी.आर-१७०/डेस्क-१, दिनांक ७/८/१९९७ रोजी प्रसारित करण्यात आलेला होता. त्यामध्ये दिनांक ३/६/२००० व दिनांक ३/१/२००३ मध्ये पुरकपत्रे प्रसारित करण्यात आलेली होती. सदरहू शासन निर्णय हे केंद्र सरकारची तत्कालीन पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणा विचारात घेऊन घेण्यात आलेले होते. त्यावेळी राज्य सरकारला केंद्रीय पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचनेनुसार पर्यावरण अनुमती देण्याचे कोणतेही अधिकार नव्हते. त्यामुळे सदरहू अधिसुचनेचा आधार घेऊन, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासनाने स्वतंत्र शासन निर्णय दिनांक ७/८/१९९७ निर्गमित करुन, त्यामध्ये वेळोवेळी योग्य त्या सुधारणा केलेल्या होत्या.

दिनांक १४/९/२००६ रोजी केंद्र सरकारने तत्कालीन पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना, १९९४ निष्प्रभावित करुन, नविन पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना, २००६ मध्ये संमत केली. सदरहू अधिसूचना अंमलात आल्यामुळे, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासनास सदरहू अधिसुचनेनुसार अनेक उद्योगांना/प्रकल्पांना राज्य सरकारच्या स्तरावर पर्यावरण अनुमती देण्याचे प्राधिकर देण्यात आलेले आहेत.

सदरहू नविन पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार राज्य सरकारला देण्यात आलेल्या पर्यावरण अनुमती प्राधिकारामुळे, दिनांक ७/८/१९९७ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारीत शासन निर्णयातील अनेक प्रकल्पांच्या पर्यावरण अनुमती व

प्रक्रियांमध्ये केंद्रीय अधिसुचनेतील निकष व राज्य शासन निर्णयातील निकष यामध्ये तफावत असल्याचे आढळून आलेले होते. त्यामुळे महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक ७/८/१९९७ व त्यामधील सुधारीत निर्णयातील तरतुदींचा फेरविचार करण्याकरिता सचिव, पर्यावरण विभाग यांच्या दालनात दिनांक २५/१०/२०१० रोजी बैठक आयोजीत करण्यात आलेली होती. त्यामध्ये उप-सचिव, आस्थापना शाखा, तांत्रिक शास्त्रज्ञ-१, २ आणि ३, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन; सदस्य सचिव व वरिष्ठ विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे उपस्थित होते. सर्व संबंधितांशी झालेल्या चर्चेनुसार मप्रनि मंडळाने संबंधीत महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक ७/८/१९९७ व त्यामध्ये झालेल्या सुधारित / पुरक निर्णय हे नविन केंद्रीय पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना अंमलात आल्यामुळे, ज्या तत्कालीन केंद्रीय पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, १९९४ व त्यामधील सुधारणा लक्षात घेऊन सदरहू महाराष्ट्र शासन निर्णय प्रसारित करण्यात आलेले होते, ते निष्प्रभावित झाले असल्याबाबत योग्य तो स्वतंत्र प्रस्ताव मप्रनि मंडळाने पाठवावा असे ठरले. त्यानुसार खालीलप्रमाणे प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांना मंडळाच्या दिनांक १/११/२०१० च्या पत्रानुसार पाठविण्यात आला होता.

१. महाराष्ट्र शासनाने दिनांक ७/८/१९९७ रोजी तत्कालीन केंद्रीय पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना, १९९४ व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणा विचारात घेऊन, महाराष्ट्र राज्यांच्या अखत्यारित योग्य ते शासन निर्णय प्रसारित केलेले होते. नविन पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना, २००६ प्रसारित केल्यामुळे, तत्कालीन केंद्रीय पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना, १९९४ व त्यामध्ये झालेल्या वेळोवेळीच्या सुधारणा ह्या अधिग्रहित केल्यामुळे, सदरहू तत्कालीन पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना, १९९४ वर आधारित महाराष्ट्र शासनाने घेतलेला शासन निर्णय देखील आपोआप निष्प्रभावित झालेला आहे.

परिणामत: दिनांक ७/८/१९९७ चा शासन निर्णय व त्यामध्ये प्रसारित केलेले पुरक निर्णय दिनांक ३/६/२००० व ३/१/२००३ हे निष्प्रभावित ठरवून, योग्य ते स्पष्टीकरण निर्गमित करणे गरजेचे आहे.

२. दिनांक २५/१०/२०१० च्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे जे प्रकल्प यापूर्वी केंद्र शासनाच्या अधिसूचनेमध्ये समाविष्ठ होते, अशा प्रदुषित प्रकल्पांना महाराष्ट्र शासनाच्या धर्तीवर विनियमित करणे गरजेचे आहे. त्याबाबत पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन स्वतंत्र मार्गदर्शक तत्वे महाराष्ट्र शासनाच्या धर्तीवर प्रसारित करेल, असे ठरले होते.

उपरोक्त मंडळाच्या दिनांक १/११/२०१० च्या पत्राबाबत पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांच्या दिनांक २५/४/२०११ रोजीच्या पत्रानुसार असे कळविले की, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वने मंत्रालयाने त्यांच्या दिनांक १५/९/२००६ च्या अधिसूचनेनुसार त्यापूर्वीचे पर्यावरण अनुमतीबाबतचे आदेश/अधिसूचना अधिक्रमित करुन, सुधारित पर्यावरण मुल्यांकन अधिसूचना, २००६ पारित केलेली आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या १९९४ च्या अधिसूचनेनुसार आधारीत असलेला राज्य शासनाच्या विषयाधीन शासन निर्णय रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सद्यस्थितीत केंद्र शासनाच्या दिनांक १४/९/२००६ च्या अधिसूचनेनुसार कार्यवाही करण्यात येत असल्याने, राज्य शासनाच्या दिनांक १९९७ चा शासन

निर्णय व त्यातील सुधारणा विचारात घेण्यात येऊ नयेत. सोबत पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक २५/४/२०११ च्या पत्राची प्रत योग्य त्या माहितीसाठी सोबत जोडण्यात येत आहे.

त्यामुळे महसूल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वाळू व रेती उत्खननाच्या दिनांक २५/१०/२०१० च्या शासन धोरणानुसार ५ हेक्टरपेक्षा कमी असलेल्या वाळू / रेती गटाकरीता उत्खननासाठी मप्रनि मंडळाचे संमतीपत्र घेण्याची आवश्यकता नाही, असे स्पष्ट होते. तरी यापुढे ५ हेक्टरपेक्षा कमी असणा-या वाळू व रेती उत्खननासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कोणतेही संमतीपत्र देऊ शकणार नाही. परंतु नवीन वाळू व रेती उत्खनन धोरण, २०१० नुसार ५ हेक्टरपेक्षा जास्त व ५० हेक्टरपर्यंत वाळू उत्खननाकरिता राज्य पर्यावरण तज्ञ मुल्यांकन समितीने योग्य ते पर्यावरण मुल्यांकन करुन, राज्य पर्यावरण तज्ञ मुल्यांकन समितीने योग्य ती पर्यावरण अनुमती देणे गरजेचे आहे. तसेच, ५० हेक्टरपेक्षा जास्त वाळू व रेती उत्खननासाठी केंद्रीय पर्यावरण तज्ञ समितीने पर्यावरणदृष्ट्या योग्य ते पर्यावरण मुल्यांकन करुन शिफारस केल्यानंतर केंद्रीय पर्यावरण मुल्यांकन समितीने दिलेल्या पर्यावरण अनुमतीनंतरच असे उत्खनन करता येईल, असे स्पष्ट करण्यात आलेले आहे. त्यासाठी योग्य तो पर्यावरण आघात मुल्यांकन अभ्यास करणे आवश्यक करण्यात आलेले आहे. त्यामुळे अशा ५ हेक्टरपेक्षा जास्त वाळू उत्खननासाठी योग्य ती पर्यावरण अनुमती व संमतीपत्र घेणे आवश्यक होईल.

येणेप्रमाणे वरीलप्रमाणे योग्य त्या मार्गदर्शक सूचना योग्य त्या पूर्ततेकरिता प्रसारीत करण्यात येत आहेत.

( राधेश्याम मोपलवार )
सदस्य सचिव

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी : सह संचालक(जल प्रदूषण नियंत्रण)/सह संचालक(हवा प्रदूषण नियंत्रण)/वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी/वरिष्ठ विधी अधिकारी/सह संचालक (तांत्रिक)/प्रादेशिक अधिकारी(प्रकल्प व योजना/झोनल ऑफिसर(पॅम्स)/प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय), मप्रनि मंडळ, मुंबई

प्रत माहिती साठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी : मुंबई/ठाणे/पुणे/रायगड/ कल्याण/नवी मुंबई/कोल्हापूर/नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/नागपूर/चंद्रपूर, मप्रनि मंडळ.

क्रमांक: SBAC २०११/प्र.क्र. ...

① २२८१.
☏ २२०२ ५९ ४६

पर्यावरण विभाग,
मंत्रालय, १५ वा मजला, नवीन प्रशासकीय भव
मदाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २५ एप्रिल, २०११

M. P. C. BOARD
Inward Section
...
Sion, Mumbai-22

प्रति,

सदस्य सचिव,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुंबई.

विषय : शासन निर्णय दिनांक ७ ऑगस्ट, १९९७ च्या अनुषंगाने पर
अनुमतीबाबत

राज्य पर्यावरण विभागास विविध उद्योगामार्फत केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या दिनां
सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेत दर्शविण्यात आलेल्या क्षमतेपेक्षा, कमी क्षमतेच्या प्रक
संदर्भात पर्यावरण अनुमती देण्याबाबतचे प्रस्ताव प्राप्त होत आहेत.

२. केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने त्यांच्या दिनांक १५ सप्टेंबर, २००
अधिसूचनेनुसार त्यापूर्वीचे पर्यावरण अनुमतीबाबतचे आदेश/अधिसूचना अधिक्रमित करुन
पर्यावरण मुल्यांकन अधिसूचना, २००६ पारित केलेली आहे. त्यामूळे केंद्र शासनाच्या
च्या अधिसूचनेवर आधारित असलेला राज्य शासनाचा विषयाधीन शासन निर्णय रद्द क
कार्यवाही करण्यात येत आहे. सद्यस्थितीत केंद्र शासनाच्या दिनांक १५/०४/२००
अधिसूचनेनुसार कार्यवाही करण्यात येत असल्याने, राज्य शासनाचा दि. १९९७ चा शास
व त्यातील सुधारणा विचारात घेण्यात येवू नयेत.

(ज्ञा. ज. भारती)
उपसचिव, महाराष्ट्र शासन